**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - साईनाथ रंगराव महेकर
वय - २२ वर्षे
व्यवसाय - नोकरी जवान
रा/ने - निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क कुडाळ क्र. ३ जि. सिंधुदुर्ग.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोगक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू**

१. दि. ०९/०१/२०२५ रोजी माझी नेमणूक निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क कुडाळ क्र. ३ या कार्यालयात होती. सदर दिवशी सकाळी १०.४० वा. निरिक्षक साहेब यांना बातमी मिळाली की, मौजे साळेल नांगरभटवाडी येथे प्रकाश मनोहर साळकर यांच्या राहत्या घराच्या मोकळया जागेत अवैधरित्या गोवा बनावटीच्या दारु विक्रीचा व्यवसाय सुरु आहे. म्हणून दुपारी १०.४५ वा. मी, दुय्यम निरिक्षक वंजारी मॅडम, पंच व इतर स्टॅाफ असे मौजे साळेल नांगरभटवाडी येथे खाजगी वाहनाने गेलो. तेथे प्रकाश साळकर यांच्या घराच्या मागील मोकळया जागेत छापा टाकला असता त्या ठिकाणी एक इसम हातामध्ये सिमेंटची पिशवी घेवून संशयास्पदरित्या दिसून आला. म्हणून मॅडमनी त्याला थांबवून त्या पिशवीमध्ये काय आहे याची विचारणा केली असता त्याने घाबरत बॅाब्स लेमन व्होडकाच्या सिलबंद बाटल्या असल्याचे सांगितले. म्हणून मॅडमने त्या पिशवीची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामध्ये गोवा बनावटीच्या बॅाब्स लेमन व्होडकाच्या १८० मिली मापाच्या ४२ सिलबंद बाटल्या मिळून आल्या. मॅडमनी त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव प्रकाशस मनोहर साळकर वय ५१ वर्षे रा. साळेल नांगरभटवाडी घर क्र. ३१२ असे सांगितले. मिळालेल्या मुद्देमालातून नमूना प्रथकरणासाठी दोन सिलबंद बाटल्या कार्यालयीन पितळी मोहर उमठवून सिलबंद केल्या. उर्वरित मुद्देमाल सिलबंद करुन आपल्या ताब्यात घेतला. मी कार्यालयात येवून आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली. साक्षीदारास दि. ०९/०१/२०२५ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.पी१/पीडब्ल्यू१** दिली आहे. मी आरोपीस दाखविल्यास ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण.

**आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री.एच.एल.गोवेकर यांचेमार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्या मोकळया जागेत छापा टाकला त्या जागेची खात्री करण्यासाठी त्या मालकाची प्रॅापर्टीकार्ड किंवा ७/१२ पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की,

आम्हाला मुद्देमाल मोकळया जागे मध्ये सापडला. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीमध्ये नमूद पंच हे आमचे नेहमीचे पंच आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पंचाचे राहण्याचे ठिकाण कुडाळ व सावंतवाडी असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळापासून कुडाळ २५ किलोमिटर अंतरवर आहे तसेच सावंतवाडी हे ४० किलोमिटरच्या अंतरावर आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, साळेल नांगरभटवाडी हा लोकवस्तीचा भाग आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमालापैकी ज्या दोन बाटल्या प्रत्यंतरासाठी काढल्या त्याचा वेगळा पंचनामा करण्यात आलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, निव्वळ केसेचा कोटा पुर्ण करण्याकरीता आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. १०-१२-२०२५

एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.